# नंदलाल विसपुते

संचालक - विसपुते ज्वेलर्स प्रा. लि.








नाव : नंदलाल पोपटलाल विसपुते

पत्ता : ॐ चिंतामणी ज्वेलर्स,
शिवाजी चौक,
कल्याण (प) ४२१ ३०१.

संपर्क : ९८९२०६८२१५

ई-मेल : nandlalvspt@gmail.com


जन्म : ३१ ऑगस्ट १९५४

शिक्षण : एम.ए. (इंग्रजी)

कल्याणमधील लॅण्डमार्क ठरलेले ॐ चिंतामणी हे सोन्याचे दुकान आज शिवाजी चौकात डौलाने उभे आहे. विसपुते ज्वेलर्स प्रा. लि. चे नंदलाल विसपुते हे त्यांचे संचालक-मालक. नंदलाल विसपुते यांचे घराणे हे सुवर्णकाराचे. सराफी हा त्यांचा वंशपरंपरागत व्यवसाय. शिक्षणानंतर त्यांनी नोकरीचा पेशा स्वीकारला. ते महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवेची परीक्षा उत्तीर्ण होऊन सरकारी प्रशासकीय अधिकारी बनले. नोकरीच्या ३० वर्षांत १७ विभागात काम करताना त्यांनी स्वतःचा अमीट ठसा उमटवला.

६ ऑक्टोबर, २०११ रोजी विजयादशमीच्या दिवशी विसपुते ज्वेलर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या ॐ चिंतामणीची मुहूर्तमेढ कल्याण शहरात रोवली गेली. त्यापूर्वी त्यांनी नऊ वर्षे या दुकानाची पायाभरणी केली. २००२ पूर्वीच त्यांनी या जागेची दुकानासाठी निश्चिती केली होती. त्याला प्रमुख कारण म्हणजे या जागेचे लोकेशन. आपल्याला सराफाचा व्यवसाय करायचा आहे आणि त्यासाठी आपले वेगळेपण जपले पाहिजे हे त्यांनी अगोदरच ठरवले होते.

नंदलाल विसपुते यांचे वास्तव्य होते टिटवाळा येथे. पण मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीने कल्याण हे शहर अधिक प्रगतशील म्हणून ते कल्याणला स्थलांतरीत झाले आणि कल्याणकरच बनले. ते कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेत उच्च पदांवर अधिकारी होते. त्यामुळे कल्याण शहरात एक 'पब्लिक फिगर' म्हणून ते ख्यातकिर्त आहेत. मुंबई-ठाणे येथे नवीन दुकान उघडण्याऐवजी आपल्याच शहरात मनाजोगे दुकान उघडणे हे केव्हाही शहाणपणाचेच. तो शहाणपणा नंदलाल विसपुते यांनी दाखवला.



चुकीचे करायचे नाही आणि सद्सद्विवेकबुद्धी जागृत ठेऊन कोणताही निर्णय घेतल्यास तो चुकीचा ठरत नाही. भान ठेऊन घेतलेला निर्णय बेभान होऊन राबवायचा, म्हणजे यश निश्चित असते. नंदलाल विसपुते यांची हीच वृत्ती त्यांना नोकरीत यशस्वी करून गेली आणि आता सराफी व्यवसायातही त्यांना साथ देत आहे.

पारदर्शक सरकारी अधिकारी म्हणून जसा लोकांचा आपल्यावर विश्वास हवा तसा एक सच्चा व्यापारी म्हणूनही ग्राहकांचा आपल्यावर विश्वास पाहिजे. यासाठी स्वतःला सिद्ध करून दाखवावे लागते. त्यांनी नोकरीत स्वतःला सिद्ध करून दाखवले आणि व्यापारातही सिद्ध करून दाखवत आहे. म्हणूनच जवळपास तीन वर्षातच ॐ चिंतामणी हे नाव या क्षेत्रात सर्वतोमुखी झाले आहे.

आपले दुकान हे सर्वोत्तमच असावे असा नंदलाल विसपुते यांचा अट्टहास होता. जिथे गुणवत्ता हवी तिथे तडजोड करायची नाही, हा त्यांचा मुळचाच स्वभाव असल्यामुळे या दुकानाच्या इंटेरिअर आणि दैनंदीन कामकाजाच्या स्वरुपावर बारकाईने लक्ष दिले. रास्त भाव, वाजवी घडणावळीचे दर आणि दागिन्यातील खात्रीची शुद्धता ही त्यांच्या दुकानाची वैशिष्ट्ये. ॐ चिंतामणी या दुकानात कोणताही ग्राहक आपल्या दागिन्यांच्या शुद्धतेची खातरजमा करून घेऊ शकतो ते त्यांच्या कॅरेट मीटरवर.

आज नंदलाल विसपुते हे स्वतः, त्यांची पत्नी प्रतिभा, मुलगा राजकपिल, सून गौरी हे चौघेही दुकानाचे कामकाज सांभाळतात. प्रशिक्षित कर्मचारीवर्ग, अत्याधुनिक डिझाईन्स हे ॐ चिंतामणीची खासियतच. यात प्रमुख वाटा आहे तो त्यांचा मुलगा राज याचा. विसपुते यांनी आपला मुलगा राजकपिल यास घडविले. राज हा उच्चशिक्षित असल्याने नोकरी किंवा लहानमोठा उद्योग करू शकला असता. तथापि, आपल्या वंशपरंपरागत धंद्यातच त्याची ओढ होती. ट्रेनिंग आणि अनुभवाच्या उद्देशासाठीच त्याने चिंतामणी ज्वेलर्स, ठाणे आणि गितांजली ज्वेलर्स, मुंबई यांच्याकडे काम केले. सहा वर्षांचा अनुभव गाठीशी जमा झाल्यानंतर ते विसपुते ज्वेलर्स या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक झाले. आज ॐ चिंतामणी ज्वेलर्स या शोरूमची सर्व जबाबदारी राजकपिल सांभाळत आहे. नुकताच व्यास क्रिएशन्सचा करिअर आयडॉल हा पुरस्कार त्यांना त्यासाठीच देण्यात आला.

या उद्योगातील आपली इमेज टिकली पाहिजे, लोकांच्या नजरेसमोर सदोदित काहीना काही तरी चांगले राहिले पाहिजे म्हणून त्यांनी विविध योजना आखून राबवल्या आहेत. लग्नसराईत मंगलसूत्र महोत्सव, १० ग्रॅम सोन्यावर एक हजार रुपयांची सूट, सोन्याची गुंतवणूक या त्यापैकीच काही योजना. प्रत्येक सणावाराला ग्राहकांसाठी विशेष स्कीम राबविण्याचा ॐ चिंतामणीचा मनोदय असतोच. गेल्या दोन दिवाळसणांच्या वेळेस नॅनो कार, स्कुटी, एलसीडी टीव्ही यांसारखी आकर्षक बक्षिसे त्यांनी ग्राहकांना लकी ड्रॉ द्वारे दिली.

भविष्यातील प्रकल्पांविषयी नंदलाल विसपुते हे फार आशावादी आहेत. कल्याण येथील ॐ चिंतामणी ज्वेलर्स या शोरुमचे विस्तारीकरण सत्वर करण्याचा त्यांचा मानस आहे. तसेच मुंबई शहरात देखील अंधेरी-जुहू परिसरात एक मोठे शोरूम सुरु करण्याचा त्यांचा मनोदय आहे.

शोभे तनी, भावे मनी

ॐ चिंतामणी™

विसपुते ज्वेलर्स प्रा. लि. यांचे

# ॐ चिंतामणी ज्वेलर्स

शिवाजी चौक, कल्याण (प) www.omchintamani.com